अग्रलेखांचा नवा काळ बादशहा
संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवा काळ
।। न मे भक्त: प्रणश्यति ।।
अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# विधानसभा निवडणुकांमध्ये थैलीशाहीचाच प्रभाव

निवडणुकांमध्ये धनशक्तीचा प्रभाव आणखीनच वाढलेला दिसून येतो. ज्या पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होत आहेत, तिथे सुरू असलेल्या प्रचाराच्या काळात निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांनी आतापर्यंत तब्बल वीस कोटी रुपयांची रक्कम जप्त केली. मध्य प्रदेशमधला प्रचार आता थंडावला असला तरी अन्य राज्यांमध्ये अजूनही वेगवेगळ्या उमेदवारांच्या प्रचार गाड्यांमध्ये लाखो रुपयांच्या रोख रकमा सापडत आहेत. धक्कादायक भाग असा की, दिल्लीत तर आम आदमी पार्टीचे स्टिकर असलेल्या गाडीत तब्बल साडेतीन कोटी रुपये रोख सापडल्याचे वृत्त प्रसिध्द झाले आणि याच वेळी आम आदमी पार्टीच्या नेत्यांनी त्यांच्याविरोधात काँग्रेस भाजपाने चौदाशे कोटी रुपये जाहिरातींच्या माध्यमातून खर्च केल्याचा आरोप केला आहे. प्रत्यक्ष या आरोपामध्ये किती तथ्य आहे हा भाग जरी वेगळा असला तरीसुध्दा कोणताच राजकीय पक्ष किंवा उमेदवार निवडणुकीतल्या पैशाच्या प्रभावापासून दूर राहू शकलेला नाही हे सिध्द होते. मग तो पक्ष काँग्रेस असो, भाजपा असो किंवा भ्रष्टाचाराच्या विरोधात उभा राहिलेला आम आदमीसारखा नवखा पक्ष असो. निवडणुकीच्या काळात एकमेकांवर आरोप प्रत्यारोप होत असतात. कोणी कोणी, कसा पैशाचा वापर केला याबाबतही टीकाटिपण्णी होते. परंतु, हे सगळेच केवळ आरोप असतात असे नाही. तर ही काही अंशी वस्तुस्थिती असते. निवडणुकीतल्या प्रचाराच्या खर्चावर मर्यादा असावी म्हणून आयोगाने आचारसंहिता तयार केलेली आहे. परंतु ती पाळण्याची जबाबदारी कोणताही राजकीय पक्ष दाखवत नाही आणि म्हणूनच ते नियम असूनही निवडणूक आयोगाला खास पथक नेमून राजकीय पक्षांच्या या प्रचारांवर लक्ष ठेवावे लागते. गेल्या आठवड्यापर्यंत निवडणूक आयोगाने सोळा कोटी रुपये वेगवेगळ्या राज्यातल्या प्रचारामध्ये जप्त केले. तर सर्वाधिक रक्कम राजस्थानमध्ये जप्त झाली. तिथून सात कोटी तेरा लाख रुपये तर, मध्य प्रदेशमध्ये पाच कोटी एकोणसत्तर लाख रुपये, छत्तीसगढमध्ये तीन कोटी शहाऐंशी लाख रुपये, मिझोराममध्ये पाच लाख रुपये तर, दिल्लीत तीन कोटी रुपयांची रक्कम निवडणूक लढवत असलेल्या उमेदवारांच्या वाहनांमधून जप्त केली गेली. आतापर्यंत ही रक्कम निश्चितच वीस कोटींपर्यंत पोहचली असण्याची शक्यता आहे. याशिवाय निवडणूक आयोगाच्या लक्षात येणार नाही, अशा पध्दतीने पाण्यासारखा पैसा खर्च केला गेला हे सिध्द होते.

### लोकशाहीचे मूल्य हरवले

आपण फार श्रध्दा ठेवून मतदानाला जातो. लोकशाहीचा सन्मान राहावा, जागरूक नागरिक म्हणून आपण आपले कर्तव्य बजवावे. अशा भावनेपोटी अनेक मतदार अतिशय प्रामाणिकपणे मतदान करतात. परंतु या प्रामाणिकपणापेक्षाही गैरमार्गाने पैशांच्या थैल्या मोकळ्या होतात. प्रामुख्याने झोपडपट्ट्या आणि ग्रामीण भागामध्ये पैसे वाटप करूनच प्रचार केला जातो. कोणता पक्ष जास्तीत जास्त पैसे देतो आहे किंवा कोणकोणत्या वस्तुंचे वाटप करतो आहे, याच्यावर मतदानाचे प्रमाण अवलंबून असते. अगदी साध्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीपासून ते लोकसभा निवडणुकीपर्यंत आता तर मतांचे रेटही ठरून गेले आहेत. याशिवाय निवडणुकीला कोणता आणि किती तगडा उमेदवार उभा आहे याचा अंदाज घेऊन पैशांची मागणी करण्याचा प्रकारही आढळून येतो. केवळ जाहीरनामा, विकासकामांची यादी, त्या उमेदवाराचे चारित्र्य किंवा प्रामाणिकपणा, पक्षाचे नेतृत्व या गोष्टींवर आता काहीही अवलंबून राहिलेले नाही. किती पैसा मोकळा सोडला जातो आणि जाहीरनाम्यांमधून काय काय वस्तू फुकट देण्याचे आमिष दाखवले जाते यावर मतांचे प्रमाण ठरत असते. हा प्रभाव असल्यामुळेच दिल्लीत आम आदमी पार्टीसारख्या भ्रष्टाचाराच्या विरोधात उभे राहिलेल्या पक्षाला मनासारख्या जागा मिळण्याची शक्यता वाटत नाही. याचा अर्थ एकूणच आपल्या निवडणूक व्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार हा किती खोलवर रुजलेला आहे हे सिध्द होते. आपण भलेही किती मोठे तोंड करून आपल्याकडे लोकशाही व्यवस्था आहे अशी पाठ थोपटून घेत असलो तरी या लोकशाहीच्या नावाने थैलीशाहीचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत असल्याचे पुन्हा सिध्द होते.

### राजकीय पक्षांचे संरक्षण

अजून तर लोकसभा निवडणुका व्हायच्या आहेत. या निवडणुकांना मिनी लोकसभा निवडणुकीची उपमा दिली जात आहे. परंतु जर का या मिनी लोकसभा निवडणुकीतच वीस–वीस हजार कोटी रुपये उधळले जात असतील, तर प्रत्यक्ष लोकसभा निवडणुकीत पैशाचे काय थैमान राहील याचा सहज अंदाज येतो. हा सगळा लोकशाहीचा प्रवास अत्यंत धोकादायक मार्गांनी होतो आहे. लोकशाही आणि तिच्या मूल्यांचा कोणताच संबंध राहिलेला नाही असे म्हणणे भाग पडते. सामाजिक मूल्ये आणि पैशाचा प्रभाव याचा विचार केला तर स्वातंत्र्याच्या केवळ साठ वर्षातच लोकशाहीतल्या मुलभूत तत्त्वांचेच अपहरण झाले आहे, असे म्हणणे भाग पडते. आश्चर्याची गोष्ट अशी की, या धनशक्तीच्या प्रभावाबद्दल कोणत्याच राजकीय पक्षाला जराही सोयरसुतक वाटत नाही. प्रत्येक राजकीय पक्ष आपण कसे त्यामध्ये सहभागी नाही, हे दाखवण्यासाठीच आटापिटा करतो. परंतु परिस्थिती तशी नाही. उलट या पक्षांकडून होणारे त्याचे समर्थन लोकशाहीला काळिमा फासणारेच ठरते. आज निवडणूक आयोगाने आपल्या पध्दतीने लक्ष ठेवून निवडणुकीतला पैशाचा प्रभाव रोखण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणताच राजकीय पक्ष कोणतीच नैतिक जबाबदारी स्वीकारायला तयार नाही किंवा, हा प्रभाव रोखला जावा अशी त्यांची इच्छाही दिसून येत नाही.